आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२ सप्टेंबर २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताच्या सध्याच्या आर्थिक वृद्धीपेक्षा सात ते आठ टक्के अधिक वाढीची भारताची क्षमता आहे असं जागतिक बँकेच्या अध्यक्षांचं प्रतिपादन

- एनएचएआयच्या टोल वसुलीत झालेल्या कथित फसवणुकीच्या प्रकरणात ईडीचे देशभरात १४ ठिकाणी छापे

- दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची चौकशी सीबीआयकडे सोपवण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश

**आणि**

- चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदंबी श्रीकांतचा दुसऱ्या फेरीत प्रवेश, लक्ष्य सेन मात्र स्पर्धेतून बाहेर

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल युरोपीयन युनियनच्या अर्थव्यवस्था विभागाचे आयुक्त वाल्दिस डॉम्ब्रोवस्किस यांची देखील भेट घेतली. यावेळी भेटीत भारत आणि युरोपियन युनियनमधल्या आर्थिक तसंच वाणिज्य भागीदारीवर चर्चा झाली.भारत आणि युरोपियन युनियनमधला मुक्त व्यापार करार, लवचिक आणि वैविध्यपूर्ण पुरवठा साखळीचं बळकटीकरण, कच्चा माल आणि तंत्रज्ञान याबाबतीतले सहकार्य, फिनटेक, कृत्रिम बुद्धीमत्ता तसंच जनरेटीव एआय अशा अनेक क्षेत्रांमधल्या वाढती संधी आणि सहकार्य याबाबतही अशा अनेक बाबींवर चर्चा झाली.

या परिषदेत सहभागी झालेल्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अजय बंगा यांची भेट घेतली. भारतात बहुस्तरीय गुंतवणूक हमी आणि इतर महत्त्वाच्या मुद्यांवर यावेळी चर्चा झाली.

भारत सध्याच्या सात ते आठ टक्के आर्थिक वृद्धीदरापेक्षा जास्त वाढीची क्षमता भारतीय अर्थव्यवस्थेत आहे, असं प्रतिपादन जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनी केलं आहे. अमेरिकन ॲशाविले इथं जी-२० देशांच्या अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकांच्या

गव्हर्नर्सच्या परिषदेच्यावेळी ते बोलत होते. जागतिक स्तरावरचे उर्जा संकट, अनिश्चित व्यापार तसंच एल निनोचा परिणाम अशा अनेक गोष्टींमुळे भारताच्या आर्थिक कामगिरीवर परिणाम झाल्यांचं त्यांनी नमूद केलं. आताची वाढ ही भारताच्या क्षमतेची चुणूक आहे असंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जलशक्ती मंत्रालयाच्या दोन दिवसीय विभागीय परिषदेच्या समारोप सत्राला संबोधित करणार आहेत. टीम इंडिया ही भावना बळकट करण्यासाठी आणि सहकारी संघराज्यवादाच्या दृढीकरणासाठी विभागीय परिषदेच्या मालिकांची संकल्पना प्रधानमंत्र्यांनी मांडली होती. त्या अनुषंगाने ही पहिलीच विभागीय परिषद आहे. केंद्र आणि राज्य सरकार यांना एकाच व्यासपीठावर आणून या क्षेत्रातल्या प्राधान्यक्रमावर चर्चा करण्यासाठी आणि कालमर्यादित कृती आराखडे तयार करण्यास या परिषदांची मदत होणार आहे. पाणीविषयक पायाभूत सुविधा प्रकल्पांची वेळेवर अंमलबजावणी, जल संचय जन भागीदारी, पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची शाश्वतता आणि जल जीवन मिशन ची दुसरी आवृत्ती या चार प्रमुख क्षेत्रांवर या परिषदेत विशेष लक्ष दिलं होतं.

<><><><>

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर उद्यापासून तीन दिवसांच्या यूक्रेन आणि पोलंडच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते यूक्रेनचे परराष्ट्र मत्री आंद्री सिबिहा आणि पोलंडचे परराष्ट्र मंत्री रादोस्लाव सिकोरस्की यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. या दौऱ्यात द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यावर भर दिला जाणार आहे, तसंच प्रादेशिक घडामोडी आणि परस्पर हिताच्या मुद्द्यांवर विचार विनिमय होईल, असं परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

<><><><>

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण एनएचएआयच्या टोल वसुलीत झालेल्या कथित फसवणुकीच्या प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने देशभरात १४ ठिकाणी छापे टाकले आहेत. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, राजस्थान, जम्मू, मध्य प्रदेश, नवी दिल्ली आणि कोलकाता यांचा या मोहिमेत समावेश आहे. मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत हे छापे टाकण्यात आले आहेत. अधिकृत टोल पावत्या तयार करण्यासाठी आणि टोल वसुलीच्या अधिकृत

हिशोबात अफरातफर करण्यासाठी सॉफ्टवेअर ॲपचा वापर झाल्याचा आरोप ईडीने केला आहे.

दरम्यान, परिमॅच या संकेतस्थळावर झालेल्या अवैध सट्टेबाजीप्रकरणी ईडीने विविध राज्यांमध्ये १२ ठिकाणी छापे टाकले आहेत. महाराष्ट्रात पाच ठिकाणी, दिल्ली एनसीआरमध्ये चार तर राजस्थानमध्ये दोन आणि गुजरातमध्ये एका ठिकाणी हे छापे टाकण्यात आले. सट्टेबाजीतून मिळालेल्या पैशांचं रोख रकमेत रुपांतर करून ही रक्कम देशाबाहेर पाठवायला मदत केल्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

<><><><><>

दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश आज मुंबई उच्च न्यायालयाने सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागाला दिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह राजे भोसले यांच्या खंडपीठासमोर आज या प्रकरणाची सुनावणी झाली. त्यावेळी दिशा हिचे वडील सतीश सालियन यांचा जबाब नोंदवण्यासाठी आणि तक्रार दाखल करण्यासाठी एका वरिष्ठ आणि अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे आदेश सीबीआयला देण्यात आले आहेत. मात्र, तपासादरम्यान, सबळ पुराव्यांशिवाय कोणालाही आरोपी मानलं जाणार नाही, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं. दिशा सालियन हिचा ८ जून २०२० रोजी मुंबई उपनगरातल्या एका निवासी इमारतीच्या १४व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी अपघाती मृत्युची नोंद केल्याचा तसंच आपली दिशाभूल करत आत्महत्येचा निष्कर्ष स्वीकारण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप सतीश सालियन यांनी केला होता.

<><><><><>

नेपाळमधल्या आकस्मिक पुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या अकराशेच्या वर गेली असून ओळख पटलेले मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले आहेत. अद्याप ९११ मृतदेहांची ओळख पटलेली नाही. जवळपास चार हजारांपेक्षा जास्त अजूनही बेपत्ता आहेत. नेपाळच्या राष्ट्रीय आपत्ती नियमन आणि व्यवस्थापन संस्थेने ही माहिती दिली. आतापर्यंत एकूण १ हजार ११३ मृतदेहांचं शवविच्छेदन आणि कायदेशीर ओळख पटवण्याची प्रक्रिया

पूर्ण करण्यात आली आहे. विविध जलविद्युत प्रकल्पांमधल्या ९८३ जणांचाही अद्याप शोध लागलेला नाही अशी माहिती खाजगी वीज उत्पादकांच्या संघटनेने दिली आहे.

दरम्यान, अकरा जणांचं बचावपथक आणि साडेपाच टन औषधं घेऊन भारताचं पाचवं मदत पथक विमानाने काठमांडू इथं पोचल्याची माहिती नेपाळमधल्या भारतीय दूतावासाने दिली आहे.

<><><><><>

नेपाळमधल्या पुरामुळं बिहारच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये पुराचा धोका निर्माण झाला असतानाच, भागलपूरमध्ये गंगा नदीच्या काठावर होणाऱ्या तीव्र धूपेमुळे चिंता वाढली आहे. गंगा नदीच्या तीव्र धूपेमुळे नौगछिया ब्लॉकमधील एक जुनं दुर्गा मंदिर, हनुमान मंदिर आणि सुमारे ५०० मीटर लांबीचा तटबंधवाहून गेला आहे. बाधित भागातील लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

<><><><><>

पंजाबमध्ये शेतकऱ्यांनी शेतात पिकांचे अवशिष्ट जाळू नये यासाठीची मोहीम तीव्र करण्याच्या सूचना पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. सामाजिक कार्यकर्ते, ग्रामपंचायती, शेतकरी संस्था यांच्या मदतीने गावागावात जाऊन शेतकऱ्यांना पर्यावरण संरक्षणाबाबत जागरुक करावं, असे निर्देश त्यांनी काल याविषयीच्या बैठकीत दिले.

<><><><><>

चीन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या किदंबी श्रीकांतने दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. चिनी तैपेईच्या चि यु जेनला त्यांने २१-१६,२१-१५ असं हरवलं. लक्ष्य सेनला कॅनडाच्या व्हिक्टर लाय कडून पराभव पत्करावा लागला.

मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांची जोडी थायलंडच्या जोडीला पराभूत करून पुढच्या फेरीत गेली. महिला एकेरी गटात आज तन्वी शर्मा आणि देविका सिंग यांचे सामने होणार आहेत. सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी देखील आज पुरुष दुहेरीत खेळणार आहे.

//<><><><><>//